# दातृत्वाच्या भावनेतून धावले हजारो नाशिककर



वंचित, उपेक्षितांच्या मदतीसाठी नाशिक चॅरिटेबल ट्रस्ट आयोजित १० किमी मॅरेथॉन व १८ व्या 'नाशिक रन'ला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शनिवारी सकाळी ६.३० वाजेपासूनच गुलाबी थंडीत हजारो नाशिककरांनी महात्मानगर मैदानावर हजेरी लावली. यात विशेष बालकांसह ज्येष्ठ नागरिक, महिला व लहानग्यांचाही सहभाग लक्षणीय होता. दिव्यांगांच्या गटाने मॅरेथॉनला सुरुवात केली. त्यांच्या सहभागाने उपस्थित प्रत्येकाला प्रोत्साहन मिळत होते. (वृत्त पान ३ वर) (छाया : एजाज शेख)

Scanned by CamScanner

# न थकणाऱ्या पावलांची सामाजिक बांधिलकी अधोरेखित

## पहिल्या मॅरेथॉनसह १८ व्या 'नाशिक रन'ला उत्स्फूर्त प्रतिसाद

नाशिक • समाजातील वंचित, उपेक्षित घटकांच्या मदतीसाठी दातृत्वाच्या भावनेतून हजारो नाशिककर शनिवारी सकाळी गुलाबी थंडीत धावले. यात विशेष बालकांसह ज्येष्ठ नागरिक, महिला व लहानग्यांचाही सहभाग लक्षणीय होता.

नाशिक रन चॅरिटेबल ट्रस्टतर्फे विविध कंपन्यांनी एकत्र येत सामाजिक एकोपा जोपासण्याच्या उद्देशातून १८ व्या नाशिक रनसह प्रथम मॅरेथॉनचे आयोजन केले. त्याची सुरुवात दिव्यांगांच्या गटाने केली. त्यापाठोपाठ विद्यार्थी, पालक, विविध कंपनी प्रतिनिधी व नाशिककरांनी मोठ्या संख्येने पिवळ्या रंगाचे टी-शर्ट्स परिधान करून रनमध्ये सहभाग घेतला. प्रमुख पाहुणे म्हणून महापौर सतीश कुलकर्णी, बॉश इंडियाचे व्यवसथापकीय संचालक सौमित्र भट्टाचार्य यांसह बॉश व टीडीके कंपनीचे परदेशातील मान्यवर उपस्थित होते.

सकाळी ६ वाजेपासूनच महात्मानगर मैदानावर नाशिककरांनी गर्दी केली. ७ वाजता 'नाशिक मॅरेथॉन'ला प्रारंभ झाला. महात्मानगर ते सोमेश्वर मंदिर आणि पुन्हा महात्मानगर असा १० किलोमीटरचा मार्ग होता. यात पोलीस आयुक्त विश्वास नांगरे-पाटील यांसह असंख्य खेळाडूंनी सहभाग घेतला. घरकूल परिवाराची विशेष विद्यार्थिनी आदिती जाधवच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. रॅम विजेते डॉ. महेंद्र महाजन व डॉ हितेंद्र महाजन, अल्ट्रा रनर अनिरुद्ध अथणी, नारायण वाघ, आयर्नमॅन महेंद्र छोरिया, प्रशांत डाबरी, डॉ. अरुण गचाळे, किशोर घुमरे यांनी मशाल प्रज्वलित केली. यावेळी टीडीके इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक एन. बालाकृष्णन, महापौर सतीश कुलकर्णी, नाशिक रनचे अध्यक्ष एच. एस. बॅनर्जी, उपाध्यक्ष जी. आर. रमेश, सचिव अनिल दैठणकार, खजिनदार राजाराम कासार, विश्वस्त प्रबल रे, अनंतरामन्, अशोक पाटील, श्रीकांत चव्हाण, मुकुंद भट, पॉवर ट्रेन बॉशचे विभागीय अध्यक्ष जॉन ओलिव्हर, बॉश इंडियाचे सहसंचालक एस. सी. श्रीनिवासन, संदीप नालामंगला, बॉश इंडियाचे बिदाडी प्लांटप्रमुख जार्क बेरंद, सहसंचालक कार्स्टन म्युलेर, टीडीकेचे अध्यक्ष कल्लोल सहा, अविनाश देशपांडे, डॉ. वेंकटेश, राजू गाढवे, संजय मोदी, विवेक झंकार, वरिष्ठ पोलीस अधिकारी अंदल मुदगल उपस्थित होते.









### मॅरेथॉने विजयी स्पर्धक

- १० किमी मॅरेथॉन : १५ ते ३५ वयोगट– महिला : प्रथम – योगिता वाघ, द्वितीय–दिशा बोरसे, तृतीय निवृत्ता धवड.
- ३६ ते ५० वयोगट (महिला) : प्रथम–अश्विनी देवरे, द्वितीय–नितू सिंग, तृतीय– नीता नारंग.
- ५१ ते ९९ वयोगट, महिला : प्रथम–सुचिता पालवे, द्वितीय– कल्पना कुशारे, तृतीय–रेवती चिटको.
- १५ ते ३५ वयोगट –पुरुष : प्रथम–रोहित यादव, द्वितीय–सुनीत कुमार, तृतीय–रवी कुमार.
- ३६ ते ५० वयोगट – प्रथम : सावळीराम शिंदे, द्वितीय– संतोष वाघ, तृतीय– नंदू उगले.
- ५१ ते ९९ वयोगट : प्रथम हरीश चंद्र, द्वितीय–वसंत कचरू, तृतीय–दिनकर शेळके.
- पोलीस आयुक्त विश्वास नांगरे–पाटील, मनपा सभागृह नेते सतीश सोनवणे यांसह २५० स्पर्धकांनी मॅरेथॉन पूर्ण केली.

### 'रन फॉर फन'

सकाळी ८.३० वाजता महात्मानगर मैदानापासून निघालेल्या नाशिक रन फॉरमध्येही शेकडो आबालवृद्धांनी धावत या उपक्रमाची रंगत वाढवली. दिव्यांग विद्यार्थ्यांचा गट प्रत्येकालाच प्रोत्साहन देत होता. शालेय विद्यार्थी, पालक यांसह ज्येष्ठांचा उत्साह वाखाणण्याजोगा होता. महात्मानगर मैदान, पारिजात नगर, जेहान सर्कल, स्वामी समर्थ चौक, समर्थनगर मार्गे पारिजात नगर, महात्मानगर मैदान असा मार्ग होता.










प्रारंभी 'झुम्बा' नृत्याद्वारे नाशिककरांनी वॉर्मअप केला. यामुळे अखेरपर्यंत प्रत्येक सहभागीचा उत्साह कायम होता. रनच्या अखेरीस लकी ड्रॉ काढण्यात आले. यामध्ये आकर्षक बक्षिसांचे वाटप करण्यात आले.









चिमुकल्यांनी वेधले लक्ष




